# देवरूख मधले बालपण

दोन्ही बहिणी एक वर्गात. लोकांना खूपच आश्चर्य वाटायचे. मोठी ताई माझ्यापेक्षां या वर्षानी मोठी. पण आईच्या आजारपणामुळे तिची शाळा उशीरां सुरु झाली. वडील (दादा) त्यावेळी मुंबईला राहून शिकलेले. त्यामुळे मुलांच्या शाळेत मुलीना कसे घातले हा पण लोकांच्या चर्चेचा विषय. गांवाचे नाव देवरुख. सर्व दशग्रंथी ब्राह्मण रहात असत. वर मुलींना मुलांच्या दोन तृतीयांश फी ठेवली तर माझ्या दोन्ही मुलींना इंग्लिश शाळेत घालीन असे त्यानी त्यावेळच्या अध्यक्षांना सागितले. ते कबूल झाले. गांव जरी दशग्रंथी, कोकणस्थ ब्राह्मणाचा असला तरी भरपूर कऱ्हाडे तिथे रहायचे. आता देशस्थ कऱ्हाडे कोकणस्थ असा फरक जरी फार जाणवत नाही तरी त्यावेळी तो खूपच वाटे. कारण मी देशस्थ माणसाशी लग्न केले होते. देसाई, आठले, सप्रे, पंडीत, पित्रे पेंढारकर वगैरे सर्व मडळी होती शाळेच्या बोर्डावर. मुलांच्या शाळेत जातो म्हणून पुराणाहून येणा-या बायका आम्हांला बघून थुकायच्या व फिदीफिदी हसायच्या. पुराण सुटायची वेळ शाळा सुटण्याची वेळ एकच असे. मला मात्र त्या बायकांचा राग यायचा. मी पण त्यांच्यावर कांही शेरे मारायची. पण आईला हे आवडत नसे. ती म्हणायची लोक बोलणार तुम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष करा. आमच्या नव्या घरात तू उद्यापासून अभ्यासाला जा असे वडिलांनी सागताच मी तर अवाक् झाले कारण आजीचे काका तिथे रहात असत. माझे वडील वकील होते. 1923 सली झेवियर कॉलेज मधून त्यांनी डिग्री घेतली व महाराष्ट्रांत वकीलीची सनद मिळविली. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यांतील देवरूखला त्यांची वकीली सुरु झाली. त्यानी सासऱ्याचे घर विकत घेतले. मी शाळेंत जात होते. आमच्या वेळीं 6 वर्षे पूर्ण झाल्याशिवाय शाळेत घेत नसत. घरीच 2 ते 30 पर्यंत लेख, पाढे, पावकी, निमकी, पाऊणकी, दिडकी अडीचकी व औटकी सर्व पाठ केले होत.

त्यावेळी बिगारी यत्ता होती त्यांतच प्रवेश मिळे. त्यानंतर पहिली यत्ता. दुस-या यत्तेतील गोष्ट अजून आठवते. पाटी दप्तर जमिनीवर ठेवून दहा मिनिटांच्या पाणी पिण्याच्या सुटीचा लाभ मिळे तो घेतला. दप्तर ठेवून पाणी पिण्याला गेले आणि कोणी तरी दप्तरावर पाय दिला. कोरी नवी पाटी फुटली. त्यावेळी बसायला गोणपाट असे. जागा आधी धरून ठेवायची. बाईंना सांगितले पाटी फुटली. कोणी कबूल होईना. घरी गेले. पाटीचे तीन तुकडे झाले होते. 2 ते 20 पंयत पाढे बाईनी पाटीवर लिहून आणायला सांगितले होते. मोठा कळपा जो होता त्यावर पाढे लिहिले. शाळेत गेले. बाईनी सर्व पाट्या ठेवा, मी प्रार्थना झाली की तपासते असे म्हटले. माझा कळपा पाहून बाईंचे डोके भडकले. हा कळपा कुणाचा (कळपा- पाटीची तुकडा मोठा) मी म्हटले माझा. उद्या जर हा कळपा शाळेत आणशील तर तो तुझ्या डोक्यात घालून खोक पाडीन अशी धमकी बाईनी दिली. लहानपणी मला पटकन् रडू येत असे. बाईंची धमकी ऐकून मी रडायला लागले.

दप्तर भरून घरी निघाले. घर जवळच होते. बाईनी मोलकरणीला हांक मारून हिला घरी पोचवून ये असे सांगितले. मी रडत घरी आले. झाले, वडील नेमके आंघोळीसाठी येत होते. हिला रडायला काय झाले ते म्हणाले. मोलकरणीने सांगितले पाटी फुटली म्हणून बाई रागावल्या ही रडायला लागली म्हणून घरी आणली. दोनच दिवसा पूर्वी नवीन पाटी वडिलानी विकत घेतली होती. वडिल वकील होते हे सांगितले आहेच. ते म्हणाले बाईना सांग हा कळप डोक्यांत हाणून खोक पाडाच. मग काय होते ते पहा उधा हीच पाटी (कळप) न्यायची. बाईना ठणकावून सांगायचे. मी वडीलांच्या म्हणण्याप्रमाने कळपा घेऊन गेले व बाईनां वडीलांचा निरोप

सांगितला. बाई ज्या गप्प झाल्या त्या त्यानंतर मला एकदांही रागवल्या नाहीत. आमच्या वेळी एकाच बाईकडे 2-3 क्लास असायचे

---------------------------------------------------------------------